Annexure-VI

**प्रकल्प प्रवर्तक मे. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लिमिटेड, कुंडल, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली – (४१६३०९), महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ८,५००.० टन प्रतिदिनपासून ११,५००.० टन प्रतिदिनपर्यंत (३,०००.० टन प्रतिदिन विस्तार) विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लिमिटेड, कुंडल, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली – (४१६ ३०९), महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ८,५००.० टन प्रतिदिनपासून ११,५००.० टन प्रतिदिनपर्यंत (३,०००.० टन प्रतिदिन विस्तार) विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थान - क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड स्मारक सभागृह,कुंडल, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली (क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लिमिटेड, कुंडल, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली (४१६ ३०९), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. विद्यासागर वि. किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. राजा दयानिधी,भाप्रसे,जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जयवंत शं. हजारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून

त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लिमिटेड, कुंडल, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली – (४१६ ३०९), महाराष्ट्र, यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ८,५००.० टन प्रतिदिनपासून ११,५००.० टन प्रतिदिनपर्यंत (३,०००.० टन प्रतिदिन विस्तार) विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक १६-०९-२०२४ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक २५-०९-२०२४ रोजी प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसुचनेनुसार संवर्ग ए - ५ (जे) – साखर उत्पादन यात मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने २२ मार्च, २०२४ रोजी ऑनलाईन मंजूरी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागारव्दारे १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केले. प्रकल्पाच्या विस्तारामुळे पर्यावरणावरील प्रस्तावित परिणामाचा अभ्यास करण्यासाठी

प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २७-०९-२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी पत्र दिनांक -०७-१०-२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी १२. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- १६९ / २०२४, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी-२४११२६- एफटीएस-००४८ दिनांक २६-११-२०२४ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) डॉ. राजा दयानिधी,भाप्रसे, - **अध्यक्ष**
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली.

२) श्री. जयवंत शं. हजारे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

३) श्री. विद्यासागर वि. किल्लेदार, - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ मध्ये मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सांगली,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सांगली,
५) मुख्याधिकारी,पलूस नगर पंचायत,पलूस,तालुका-पलूस.जिल्हा-सांगली
६) तहसीलदार,तहसील कार्यालय,पलूस,तालुका-पलूस,जिल्हा-सांगली,
७) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये- कुंडल,कुंभारगांव, आंधळी, देवराष्ट्रे, जाधवनगर, रामपूर, बलवडी आणि दुधोंडी, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली
८) उपसचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
९) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, २रा,३रा आणि ४था मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्रमांक ७, सिलेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई – ४०० ०२२
१०) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन इमारत, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कोल्हापूर – ४१६ ००२
११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,३००/२, उद्योग भवन, शासकीय विश्रामधामजवळ, विश्रामबाग, सांगली – ४१६ ४१५
१२) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध आहेत.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांचेकडे एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या नाहीत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिकांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा स्थानिक शेतक-यांच्या हिताचा, स्थानिकांना रोजगाराची संधि उपलब्ध करुन देणारा प्रकल्प आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी एकूण गुंतवणूक ही ₹ १,०१०.० लाख (म्हणजे ₹ १०.१० कोटी) एवढी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी सुमारे ₹ १,०१०.० लाख (₹ १.०१ कोटी) एवढी गुंतवणूक करण्यात येणार आहे. सदरहू विस्तारित प्रकल्पामुळे प्रकल्पात ४० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे, परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात (indirect business) प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सदरहू प्रकल्पासाठी ३७२.० घनमीटर प्रति दिन पाण्याची आवश्यकता असून पाण्याची गरज ही कृष्णा नदीतून पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने पूर्ण करण्यात येईल. प्रकल्पात उत्पन्न होणा-या औद्योगिक व घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही.

तसेच प्रकल्पात भूगर्भातील पाण्याची वापर कुठल्याही प्रकारे करण्यात येणार नाही. जरी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार एकूण भूखंडाच्या ३३% हरित पट्टा विकसित करणे बंधनकारक असले, तरीही प्रकल्पात एकूण भूखंडाच्या ३४.९% हरितपट्टा विकसित करण्यात येईल. कार्यरत प्रकल्पात १०,३७० झाडे लावलेली असून पुढील तीन वर्षात २५,००० झाडे विस्तारित प्रकल्पात लावण्यात येतील. तसेच कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (CER) एकूण खर्चाच्या १% खर्च करण्याचा प्रस्ताव असून तो एकूण ₹ १०.० लाख एवढा असेल. तसेच पर्यावरण व्यवस्थासाठी भांडवली खर्च ₹ १००.० लाख तर आवर्ती खर्च ₹ ८५.० लाख रुपये प्रति वर्ष एवढा असेल. प्रस्तावित प्रकल्पात वर्षाजल पुनर्भरण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प हा स्थानिक तसेच महाराष्ट्र राज्य व देशासाठी फायद्याचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**<u>उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सूचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>**

१) **<u>श्री. जयराज ओव्हाळ, सरपंच, कुंडल ग्रामपंचायत, तालुका-पलूस, जिल्हा-सांगली:-</u>**

- सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे रोजगारनिर्मिती होणार आहे काय?
- प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे सदरहू विस्तारिकरणामुळे परिसरातील प्रत्यक्ष (direct)

आणि अप्रत्यक्ष (indirect) रोजगारात वाढ होणार आहे. विस्तारीकरण प्रकल्पात ४० (चाळीस) व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे. तसेच सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे अप्रत्यक्ष रोजगारात म्हणजे ऊसतोड कामगार, स्थानिक चहा विक्रेते (हॉटेल्स), वाहतुकदार, दुकानदार, दुचाकी दुरुस्ती दुकाने यांना या विस्तारिकरणाचा फायदा होणार आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की येथे प्रकल्प प्रतिनिधीसुध्दा उत्तर देऊ शकतात.

२) **<u>श्री. नीतीन दिनकर लाड, राहणार-कुंडल,तालुका-पलूस,जिल्हा-सांगली:-</u>**

- सदरहू प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा व गावातील व शेजारील गावातील लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा ही विनंती.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना उत्तर देण्याची सूचना केली.

- प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी उत्तर दिले की पर्यावरण सल्लागार यांनी सांगितल्याप्रमाणे प्रकल्पात ४० (चाळीस) पेक्षा जास्त लोकांना रोजगाराची संधि मिळणार आहे. तसेच हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचा आमचा शंभर टक्के प्रयत्न आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

३) **<u>मा. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>**

- प्रकल्प उत्पादनात ३,०००.० टीसीडी वाढ होणार आहे. तरी प्रकल्पातील कार्यरत औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र -ईटीपी (Effluent Treatment Plant) आणि सीपीयु (कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट) यांचे विकसन

(upgradation) करण्यात येणार वा सदस्यस्थितीतील कार्यरत क्षमता प्रदूषण नियंत्रणास पुरेसी आहे?

- पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की की सद्या प्रकल्पात कार्यरत १,०००.० घनमीटर क्षमतेचा औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र -ईटीपी (Effluent Treatment Plant) आहे. तो विकसित (upgradation) करण्यात येईल. तसेच प्रकल्पात स्प्रे पॉन्ड ओव्हरफ्लो प्रक्रिया यंत्रणा सुध्दा कार्यान्वित आहेत.
- **सदस्य,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प विस्तारीकरणामुळे औद्योगिक सांडपाण्यात किती वाढ होईल याबाबत विचारणा केली.
- पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की निकषांनुसार प्रति टन १००.० लिटर औद्योगिक सांडपाण्यात वाढ होईल. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यानुसार सिंचन योजनेबाबत (Irrigation Plan) विचारणा केली. प्रकल्पात जमिन उपलब्ध आहे, तर त्यानुसार Rotation cha Irrigation Plan तयार करणे गरजेचे आहे. तो करण्यात यावा.
- **सदस्य,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले कार्यरत प्रकल्पातील सांडपाण्याबाबत तक्रार स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त नाही. कार्यरत प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची हाताळणी ही योग्य प्रकारे करण्यात येत आहे. मात्र विस्तारिकरणामुळे सुमारे ३००.० घनमीटर प्रतिदिन अतिरिक्त औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होणार आहे. त्याबाबत सादरीकरणात नियोजन (Provision) दर्शविण्यात आलेले नाही. तरी सिंचन योजना (Irrigation Plan) तयार करण्यात यावा.
- पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की कार्यरत प्रकल्पातील धोरणांनुसारच विस्तारिकरणानंतर उत्पन्न होणारे अतिरिक्त औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्प परिसरात सिंचनासाठी (Irrigation) वापर करण्यात येणार आहे.

- त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी स्पष्टीकरण दिले की विस्तारिकरणामुळे उत्पन्न होणा-या अतिरिक्त औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रकल्पातच सिंचनासाठी वापरण्यासाठी अतिरिक्त भूखंड ही प्रकल्पात उपलब्ध आहे. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

**आयोजक,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना,विचार, टीकाटिप्पणी वा आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. मा. जिल्हाधिकारी आपणासाठी येथे आलेले आहेत. त्याची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येईल.

**सदस्य,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्पास समर्थन असल्यास तेसुध्दा सुनावणी दरम्यान देऊ शकता अशी सूचना केली. सर्व उपस्थितांनी प्रकल्पास समर्थन टाळ्या वाजून दर्शिवले.

**आयोजक,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सांगितले की मा. अध्यक्ष यांनी प्रकल्प व्यवस्थापनास सूचना केली आहे की त्यांना उपस्थितांना काही विचार सांगायचे आहेत काय? प्रकल्प व्यवस्थापनाने तसे नसल्याचे सांगितले. आयोजक यांनी **मा. अध्यक्ष,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना उपस्थितांसाठी दोन शब्द सांगण्याची विनंती केली.

**मा. अध्यक्ष,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की प्रकल्प सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थितांना सांगितलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांचा कार्यरत प्रकल्पात ऊस गाळप क्षमता ८,५००.० मे. टन प्रतिदिनपासून ११,५००.० मे. टन पर्यंत करण्याचा मानस आहे. प्रकल्पाचे सादरीकरण व स्थानिकांनी उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार मी काही सूचना करु इच्छितोः-

अ) प्रकल्पात उत्पन्न होणा-या प्रक्रिया न केलेले औद्योगिक सांडपाण्याचा (Untreated Industrial Effluent) एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही याची काळजी प्रकल्प प्रवर्तक यांनी घेण्यात यावी. तसेच प्रक्रिया केलेले सांडपाणी (Treated Industrial Effluent) बाहेर जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी,

ब) सादरीकरणात सल्फर-डाय-ऑक्साईड सोडला जाईल असे प्रतिपादन केलेले आहे. मी गृहित धरतो की सल्फर-डाय-ऑक्साईड शासनाच्या पारित मानकांप्रमाणेच (within prescribed limits) सोडले जाणार आहे. पर्यावरण कायद्यांनुसार त्यावर प्रक्रिया करुनच नंतर ते वातावरणात सोडण्यात यावेत.

क) तसेच प्रकल्पातील प्रस्तावित चिमणी (stack) स्थापित करताना वा-याच्या दिशेचा अभ्यास करुनच ती स्थापित करण्यात यावी. वा-याची दिशा एका बाजूस, तर प्रकल्पातील वायू उत्सर्जन हे दुस-या बाजूस असे होऊ नये.

ड) प्रकल्प प्रवर्तक जरी विविध सामाजीक उपक्रम राबवित आहेत, तरीही माझी जबाबदारी म्हणून मी सांगू इच्छितो की कंपनीच्या सीएसआर निधीतंर्गत परिसरातील, आजूबाजूंच्या गावातील शाळांना मदत करावी. आपला सहकारी साखर कारखाना असून आपणाकडून सर्वांना सहकार्य करावे. आपणाकडून मोठी अपेक्षा आहे.

इ) प्रकल्पात ४० (चाळीस) व्यक्तींना रोजगाराची संधि मिळेल असे सांगण्यात आले. मात्र आपण त्याबाबत मर्यादा न ठेवता जास्तीतजास्त लोकांना रोजगाराची संधि देण्यात यावी.

ई या बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत जरी ऑनलाईन संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असेल, तरीही बैठकीच्या इतिवृताची मराठी व इंग्रजी प्रत प्रकल्पबाधित सर्व ग्रामपंचायतीस दर्शनी फलकावर (notice board) स्थानिक ग्रामस्थांच्या माहिती, अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन आपण पारदर्शकतेचे पालन केल्याचे दिसून येईल.

**मा. अध्यक्ष,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरहू बैठक शांततेने पार पाडण्यास सहकार्य केल्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानले.

**आयोजक,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, शासकीय अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले. तसेच आयोजक यांनी बैठकीस मदत करणा-या पोलिस प्रशासनाचेही आभार मानले आणि

मा. अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

सदरच्या सुनावणीची कार्यवाही सकाळी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी १.१५ वाजता संपन्न झाली.

**( विद्यासागर वि. किल्लेदार )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

**( जयवंत शं. हजारे )**
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

**( डॉ. राजा दयानिधी )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा जिल्हा दंडाधिकारी , सांगली.